# ‘प्रसिध्दी पत्रक’

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**सोमवार, दि.१६/०९/२०१९**

## “महिलेवर लैंगीक अत्याचार.”

**पोलीस ठाणे, भुम:** बाबासाहेब श्रीमंत गव्हाणे रा. पिंपळगाव, ता.भुम याने दि. ०९.०९.२०१९ रोजी १३.०० वा. सु. एका महिलेवर (नाव-गाव गोपनीय) जबरदस्तीने लैंगीक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. त्यावर पिडीत महिलेने त्यास विरोध केला असता त्याने विळ्याने तिच्या डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. अशा मजकुराच्या पिडीत महिलेने वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या (एम.एल.सी.) जबाबावरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, भुम येथे भा.दं.वि. कलम ३७६ (अ), ३०७, ३५४ (अ), ३२५, ५११ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “मौजे वडगाव (ज.): कलाकेंद्रासाठी नृत्यांगणा पुरवतो म्हणुन पैसे-कार घेउन फसवणूक.”

**पोलीस ठाणे, येरमाळा:** १) आसिफ लियाकत पठाण २) पुजा भगवान जाधव दोघे रा. श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांनी दि. १३.०८.२०१८ रोजी मौजे वडगाव (ज.), ता.कळंब येथे येउन गौरी कलाकेंद्रासाठी नृत्यांगणा देतो असे म्हणुन रामचंद्र अंधारे व नागेश श्रीपतराव कुलकर्णी रा. येडशी, ता.उस्मानाबाद यांच्या कडुन ५,००,०००/- रु. घेउन गेले. तसेच दि. १३.०९.२०१८ रोजी नागेश कुलकर्णी यांची इनोव्हा कार क्र. एम.एच. १३ एझेड ७९८६ ही विश्वासाने घेउन गेले. तसेच घेतलेली कार व नृत्यांगणा देणार नाही असे म्हणुन “तुम्ही जर श्रीरामपूरला आलात तर, तुम्हाला जिवे ठार मारु” अशी धमकी दिली. अशा प्रकारे त्यांनी नागेश कुलकर्णी यांची फसवणूक केली. अशा मजकुराच्या नागेश कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “तुळजापूर: मोटारसायकल चोरी.”

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** दत्ता रामभाऊ साळुंके रा. विश्वास नगर, तुळजापूर यांनी हॅन्डेल लॉक करुन त्यांच्या घरासमोर लावलेली हिरो स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम.एच. २५ एपी ६९६८ किं.अं. ६०,०००/- रु. ही दि. १४.०९.२०१९ रोजी २१.३० ते दि. १५.०९.२०१९ रोजी ०५.३० वा. चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## “कळंब: स्कुटर-मोटारसायकलचा अपघात.”

**पोलीस ठाणे, कळंब:** एका अज्ञात मोटारसायकल चालकाने मोटारसायकल निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन दि. १५.०९.२०१९ रोजी १६.०० वा. सु. होळकर चौक, कळंब येथे संघरत्न फकीरचंद कसबे रा. कल्पना नगर, कळंब हे चालवत असलेल्या स्कुटर क्र. एम.एच. २५ एक्यु ०३३१ ला जोराची धडक दिली. त्यामुळे संघरत्न कसबे हे खाली पडुन जखमी झाले. अशा मजकुराच्या त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात

मोटारसायकल चालकाविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३७ प्रमाणे गुन्हा दि. १५.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## **“येरमाळा: गौण खनिज (वाळू) चोरी, गुन्हा नोंद.”**

**<u>पोलीस ठाणे, येरमाळा:</u>** गणेश तानाजी उकीरडे रा. बोरगाव, जि. सोलापूर हे शासनाचा कर न भरता अवैधरीत्या डंपर क्र. एम.एच. १७ बीडी २१४२ किं.अं. १०,००,०००/- रु. यामध्ये साडेचार ब्रास गौण खनिज (वाळू) किं.अं. २२,५००/- रु. भरुन चोरुन वाहतुक करीत असतांना १०,२२,५००/- रु. च्या मालासह पोलीस ठाणे, येरमाळा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## **“जुगार अड्ड्यावर छापा.”**

**<u>पोलीस ठाणे, येरमाळा:</u>** दि. १५.०९.२०१९ रोजी १४.५५ वा.सु. मौजे तेरखेडा शिवारात १) प्रमोद बाळासाहेब घोलप २) गोपिनाथ सोपान पौळ ३) विकास पांडुरंग शिंदे ४) संदिप बिभीषन पौळ ५) औदूंबर मारुती रकटे ६) सुरेश मनोज सरवदे ७) बाळासाहेब सुखदेव पौळ सर्व रा. तेरखेडा, ता.कळंब हे तिरट जुगार खेळत असतांना जुगाराचे साहित्यासह दोन मोटारसायकली एकत्रीत किं.अं. ४०,०००/-रु., तिन मोबाईल फोन एकत्रीत किं.अं. ११,०००/- रु. व रोख रक्कम ५,५९०/-रु. असा एकुण ५६,५९०/- रु. च्या मालासह पोलीस ठाणे, येरमाळा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे म.जु.का. कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दि. १५.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## **“अवैध मद्य विक्री विरुध्द ५ कारवाया”**

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. १५.०९.२०१९ रोजी १८.१० वा.सु. बाळासाहेब आप्पासाहेब काकडे रा. अडसुळवाडी, ता.कळंब हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे आडसुळवाडी येथे १० ली. गावठी दारु किं.अं. ५००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १५.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. १५.०९.२०१९ रोजी १८.०० वा.सु. आशाबाई रामा चव्हाण रा. आंदोरा, ता.कळंब ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे आंदोरा शिवारात ५ ली. गावठी दारु किं.अं. ३००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १५.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**<u>पोलीस ठाणे, बेंबळी:</u>** दि. १५.०९.२०१९ रोजी २२.४० वा.सु. दत्ता विश्वनाथ कांबळे रा. बामणी, ता.उसमानाबाद हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे बामणी येथे देशी दारुच्या बाटल्या किं.अं. ५६०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, बेंबळी यांच्या पथकास आढळुन आले व पोलीसांची चाहुल लागताच देशी दारुचा माल जाग्यावर सोडून पळुन गेले. यावरुन

त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, लोहारा:** दि. १६.०९.२०१९ रोजी ०८.३० वा.सु. बन्सी खुबा चव्हाण रा. होळी तांडा हे दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे होळी येथे १४ ली. गावठी दारु किं.अं. ९८०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, लोहारा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, लोहारा येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** दि. १६.०९.२०१९ रोजी ०७.३० वा.सु. तेजाबाई तानाजी लांडगे रा. मुर्टा, ता.तुळजापूर ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे मुर्टा येथे १५ ली. गावठी दारु किं.अं. ९००/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, नळदुर्ग यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १६.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**"मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: ८२ कारवाया."**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. १५/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार ८२ कारवाया केल्या असुन त्यातुन २०,१०० ₹ **'तडजोड शुल्क'** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

पोलीस उपनिरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद